**<u>प्रेसनोट</u> <u>दिनांक ०८/०६/२०१९</u>**
**<u>येरवडा पोलीस स्टेशन, पुणे</u>**

**येरवडा पोलीस स्टेशन कडून शरिराविरूध्दचे ३ सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले बाबत.**

---

येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीतील सराईत गुन्हेगार नामे- (१) मजहर अफसर शेख, वय ३१ वर्षे, रा. सर्व्हे नं. १०३, जयप्रकाशनगर, येरवडा, पुणे (टोळीप्रमुख) (२) कृष्णा ज्ञानदेव शिंदे, वय २२ वर्षे, रा. सदर (टोळी सदस्य) (३) दिपक जनार्दन झंपले ऊर्फ झंप्या, वय २३ वर्षे, रा. सदर (टोळी सदस्य) यांचे विरूध्द येरवडा पो.स्टे.ला संघटीतपणे/टोळीने केलेले एकूण ७ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये जबरी चोरी करणे, घातक शस्त्रानिशी दुखापत करणे, गर्दी मारामारी करणे, धमकावणे अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. सदर आरोपी हे टोळीने गुन्हे करीत असल्याने व येरवडा परिसरात दहशत पसरवित असल्याने येरवडा पो.स्टे.कडील तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिनकर मोहिते यांनी सदर आरोपींविरूध्द मुं.पो.ॲक्ट क. ५५ प्रमाणे दि.१५/१२/२०१८ रोजी तडीपार प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर येरवडा पो.स्टे.कडील वरिष्ठ पोलीस निरी. श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे यांनी सदर तडीपार प्रस्ताव मंजूरीसाठी आवश्यक तो पाठपुरावा करून मा.पोलीस उप आयुक्त सो. परि-४ पुणे यांना माहिती पुरविली. त्यावरून मा.पोलीस उप आयुक्त सो. परि-४, पुणे यांनी त्यांचेकडील तडीपार आदेश क्र. ३२/२०१९ अन्वये दि.०८/०६/२०१९ रोजीपासून वरील तीनही गुन्हेगारांना पुणे शहर, पुणे जिल्हा व पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातून पुढील सहा महिन्याचे कालावधी करीता तडीपार केलेले आहे.

सदरचा तडीपार प्रस्तावा करीता आवश्यक ती सर्व माहिती संकलित करून, तडीपार प्रस्ताव तयार करण्यास, मा.वरिष्ठ कार्यालयास वेळोवेळी आवश्यक ती माहिती पुरविण्यास येरवडा पोलीस स्टेशन कडील सर्व्हेलन्स पथकाचे पो.हवा. ४६५० गुलाब शिवले, पो.ना. ७८३ गणेश पाटोळे, पो.शि. ७२८० शरद बांगर यांनी वरील पोलीस अधिकारी यांना मदत केलेली आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.चे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिनकर मोहिते, विद्यमान वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अजय वाघमारे, पो.हवा. ४६५० गुलाब शिवले, पो.ना. ७८३ गणेश पाटोळे, पो.शि. ७२८० शरद बांगर यांनी वरील नमूद सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यासाठी प्रस्ताव सादर करून तसेच वेळोवेळी पाठपुरावा करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**( अजय वाघमारे )**
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
अति.कार्यभार व.पो.निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे